नि.दि.दा.क्र.९/२०१९
वंदना वि. बबन
निशानी – ५९ लगत

**पुढील सरतपास प्रतिवादीसाठी श्री ए. एम्. देवळे वकील साहेब शपथेवर सुरुः**

१. मी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. शपथपत्र नि.५९ वर दाखल आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत वादीचे वकील श्री एस.जी. रामटेकेयांच्या तोंडी विनंतीवरुन तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी

दिंनाकः१७.०७.२०२३

**शपथेवर उलटतपास सर्व वादीतर्फे श्री डी.यू.ठाकरे**

२. हे म्हणणे खरे नाही कि रामाजीचे मृत्यूनंतर माझे आणि सकवारबाई हिचे नाव वारसदार म्हणून दाखवत आहे. आता मला नि क्र ४५ वरील ७/१२ उतारा दाखविण्यात आला, सकवारबाईचे नाव दाखल असल्याचे दिसून येते मात्र खाडाखोड केलेली दिसत आहे. हे म्हणणे खरे नाही कि, खाडाखोड झाले असले तरी सकवारबाईचे नाव दाखल झाले होते असे दिसते. सकवारबाईचे नावात खाडाखोड झाली आहे याकरीता मी कोणतेही अपील केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे कि वादी सकवारबाईची मूली आहेत आणि प्रतिवादी क्र २ मूलगा आहे.

३. हे म्हणणे खरे नाही कि, सकवारबाईने लेखी हक्कसोड केलेला नव्हता. साक्षदार सांगतो तोंडी हक्क सोडला होता.माझे समक्ष लेखी हक्कसोड केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की सकवारबाईचा हक्क मिळकतीमध्ये होता म्हणून तिने लेखी हक्कसोड

केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही कि, सकवारबाईचा हक्क होता म्हणून तिने तोंडी हक्क्सोड केला होता. हे म्हणणे खरे आहे कि, सर्व वादी लग्नानंतर सासरी राहायला गेले. हे म्हणणे खरे आहे कि, वादी वादमिळकतीवर येत नव्हत्या. हे मला माहीत नाही के प्रतिवादी क्र २ गणेशपेठ नागपूर येथे दूकानावर काम करतो. सकवारबाईचा वाद मिळकतीमध्ये हक्क नाही अगर हक्क नव्हता याकरीता मी कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही मला तशी आवश्कता नाही. हे म्हणणे खरे नाही कि, माझेकडे सकवारबाईचा हक्क नसलयाबाबत कोणातेही कागदपत्र नाही म्हणून मी दाखल केले नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की वाद मिळकत मी सर्वाच्या वतीने वाहत होतो. वादमिळकतीमध्ये केवळ माझा हक्क आहे यासाठी ७/१२ उतारा दाखल केला आहे. ७/१२ उता–यावतीरिक्त मी इतर कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही कि ७/१२ उता–यावतीरिक्त मी इतर कोणतेही कागदपत्र अस्तीत्वात नसलयाने मी दाखल केले नाही. ७/१२ उतारा व्यतीरिक्त असा कोणताही कागदपत्र माझेकडे नाही. वादमिळकतीची विक्री करण्यापूर्वी मी वादीनां सूचना दिली नव्हती. साक्षदार सांगतो कि त्यानां पूर्व कल्पना होती म्हणून मी सूचना दिली नाही. माझे जवाबामध्ये वादींना पूर्व कल्पना होती याबाबत मजकूर नमूद केला नाही कारण त्यांना माहीती होती म्हणून आवश्यकता नाही.

५. वादीचे वकीलांनी नियमीत दिवाणी दावा क्र १४/२०१५ मध्ये सदर साक्षदाराचा नि क्र ८४प्रमाणे झालेला उलटतपास या दाव्याचे कामी नि क्र ६२ वरील पूरसिस द्वारे स्विकारला आहे.

उलटतपास पूर्ण फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी
दिंनाकः २०.०१.२०२४

समक्ष

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी